RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक २५ (२)] शुक्रवार, डिसेंबर १२, २०२५/अग्रहायण २१, शके १९४७ [पृष्ठे ३ , किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ११४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानपरिषदेत दिनांक **११ डिसेंबर, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानपरिषद **नियम १११** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. C. BILL No. XVI OF 2025.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १६.**

**महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९७१ चा महा. २८.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.



भाग पाच-११४-१.
एचबी-२४९०-१.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ३४अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ याच्या कलम ३४अ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९७१ चा महा. २८.

"(१) राज्य शासन, अध्यक्षाचा व शासनाला योग्य वाटतील अशा संख्येतील सदस्यांचा समावेश असणारी आणि या अधिनियमान्वये शासन तिच्याकडे सोपवील अशा अधिकारांचा वापर करण्याच्या व अशी कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी, शिखर तक्रार निवारण समिती किंवा समित्या, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, घटित करील.".

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (१९७१ चा महा. २८) हा, राज्यातील झोपडपट्ट्यांची सुधारणा व निर्मूलन करण्यासाठी व त्यांच्या पुनर्विकासासाठी आणि भोगवटादारांना निष्कासित होण्यापासून व अटकावणी अधिपत्रापासून संरक्षण देण्यासाठी अधिनियमित करण्यात आला आहे. उक्त अधिनियमात झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची तसेच झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीची तरतूद देखील केलेली आहे.

**२.** उक्त अधिनियमाच्या कलम ३४अ मध्ये, संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर अधिकारिता असणारी शिखर तक्रार निवारण समिती घटित करण्याची तरतूद आहे. शिखर तक्रार निवारण समिती, उक्त अधिनियमान्वये तिच्याकडे सोपविलेल्या अधिकारांचा वापर करण्याच्या व कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी घटित केलेली आहे. शिखर तक्रार निवारण समितीसमोरील प्रलंबित प्रकरणांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे समितीला तिच्यासमोर दाखल केलेल्या तक्रारींचे निराकरण करणे व अपिले वेळेत निकालात काढणे शक्य होत नाही. त्यामुळे, समितीचे कामकाज सुलभपणे होण्यासाठी व तक्रारींचे वेळेत निराकरण करण्यासाठी आणि अपिले शीघ्रगतीने निकालात काढण्यासाठी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ याच्या कलम ३४अ मध्ये सुयोग्य सुधारणा करून त्याद्वारे शिखर निवारण समित्या घटित करण्याची तरतूद करणे इष्ट आहे, असे वाटते.

**३.** वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १० डिसेंबर, २०२५.

**एकनाथ शिंदे,**
उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण).

विधानभवन,
नागपूर.
दिनांक ११ डिसेंबर, २०२५.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव - ३
महाराष्ट्र विधानपरिषद.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.